महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:सीएमए-०४२३/सीआर-०१/२०२३/जाहिरात दिनांक:- १० मार्च, २०२३

**-: शुध्दिपत्रक:-**

**विषय :** वयाधिक उमेदवारांना अर्ज सादर करण्यास संधी देणेबाबत.

**संदर्भ :** (१)आयोगाकडून प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरात क्रमांक ०२/२०२३ ते ११/२०२३.
(२)शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :सनिव २०२३/प्र.क्र.१४/कार्या १२, दिनांक ०३ मार्च, २०२३.

विविध कारणांमुळे पुरेशा जाहिरात प्रसिध्द न झाल्याने, ज्या उमेदवारांना परीक्षांना बसण्याची संधी प्राप्त झाली नाही आणि त्यांची कमाल वयोमर्यादा संपुष्टात आली आहे, अशा उमेदवारांना परीक्षांना बसण्याची संधी प्राप्त व्हावी याकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :सनिव २०२३/प्र.क्र.१४/कार्या १२, दिनांक ०३ मार्च, २०२३ अन्वये शासन निर्णयाच्या दिनांकापासून ते दिनांक ३१ डिसेंबर, २०२३ पर्यंत प्रसिध्द होणा-या जाहिरातींकरीता विहित कमाल वयोमर्यादेमध्ये दोन वर्षाची शिथिलता देण्याबाबत शासनाकडून निर्णय घेण्यात आला आहे.

२. प्रस्तुत शासन निर्णयाच्या अनुषंगाने आयोगाकडून विविध पदभरतीकरीता प्रसिध्द करण्यात आलेल्या खालील जाहिरातींना (जाहिरात क्रमांक ०२/२०२३ ते ११/२०२३) विहित कमाल वयोमर्यादेमध्ये दोन वर्षांची शिथिलता देण्यात येत असून पात्र उमेदवारांना अर्ज सादर करण्याची संधी देण्यात येत आहे:-

| **अ.क्र.** | **जाहिरात क्रमांक** | **संवर्ग** |
|---|---|---|
| १ | ०२/२०२३ | उप अभियंता, विद्युत, गट- अ |
| २ | ०३/२०२३ | उप संचालक, गट-अ, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा |
| ३ | ०४/२०२३ | मुख्य खोदन अभियंता, गट-अ, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा |
| ४ | ०५/२०२३ | सहायक रसायनी, गट-ब, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा |
| ५ | ०६/२०२३ | सहायक प्रशासन अधिकारी, गट-ब, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा |
| ६ | ०७/२०२३ | सहायक आयुक्त, तांत्रिक, महाराष्ट्र तांत्रिक सेवा, गट-ब |
| ७ | ०८/२०२३ | सहायक संचालक, राज्य रेशीम सेवा, गट-अ |
| ८ | ०९/२०२३ | रेशीम विकास अधिकारी, राज्य रेशीम सेवा, श्रेणी- १, गट-ब |
| ९ | १०/२०२३ | सहायक संचालक, गट-ब, सांस्कृतिक कार्य संचालनालय |
| १० | ११/२०२३ | महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा- २०२३ |

३. उपरोक्त जाहिरातींस अनुसरून विहित पध्दतीने अर्ज सादर करण्यास खालील प्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे :-

(१) अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक :- ०३ एप्रिल, २०२३ रोजी २३.५९ वाजेपर्यंत.

(२) ऑनलाईन परिक्षा शुल्क भरण्यासाठी विहित अंतिम दिनांक:- ०३ एप्रिल, २०२३ रोजी २३.५९ वाजेपर्यंत.

(३) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याचा अंतिम दिनांक:- ०५ एप्रिल, २०२३.

(४) चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक :- ०६ एप्रिल, २०२३ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेत.

४. महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२३ मधून भरावयाचे प्रस्तावित असलेल्या खालील संवर्गांकरीता त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे अर्हतेमध्ये बदल करण्यात येत आहेत :-

(१) सहायक प्रादेशिक परीवहन अधिकारी, गट-अ

"केवळ पुरुष उमेदवारांसाठी :- छाती - न फुगविता ७९ से.मी. फुगविल्यानंतर किमान ५ से.मी. वाढलेली असावी"

(२) अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासकीय सेवा, गट-ब

"अन्न तंत्रज्ञान किंवा दुग्ध तंत्रज्ञान किंवा जैव तंत्रज्ञान किंवा तेल तंत्रज्ञान किंवा कृषी शास्त्र किंवा पशु वैद्यकीय शास्त्र किंवा जैव रसायन किंवा सुक्ष्मजीवशास्त्र किंवा रसायन शास्त्र किंवा वैद्यकशास्त्र या विषयातील मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी अथवा पदव्युत्तर पदवी अथवा डॉक्टरेट."

५. संबंधित मूळ जाहिरातीमधील इतर अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल नाही.

ठिकाण : मुंबई

सह सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग